# १८५-मलबार हिल विधानसभा मतदार संघ

भीमाबाई राणे म्यु. स्कूल, तळमजला, सेंट्रल प्लाझा सिनेमासमोर राजा राममोहन रॉय मार्ग, गिरगाव, मुंबई-४००००४
दूरध्वनी क्रमांक:- ०२२२३६७९१५३ Email:malbarhill१८५@gmail.com

दिनांक: २१/०४/२०२०

प्रति,

ग्रेस फौंडेशन,
होप फॉर लाईफ,
मुंबई शहर.

विषय: १८५ मलबार हिल मतदार संघाच्या कर्मचारीसाठी आरोग्य सुरक्षा किट व विनामुल्य रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्याबाबत.

महोदय,

राज्यात कोरोना विषाणूचा (कोविड-१९ ) प्रादुर्भाव झाल्याने कोरोना विषाणूवरील प्रतिबंधात्मक उपाय योजने साठी या कार्यालयीतील कर्मचारी बेघर व विस्थापित कामगारांना धान्य वाटप करणेचे काम करीत होते. सदर कर्मचाऱ्यांचे आरोग्याचे सुरक्षेकरिता ग्रेस फौंडेशन, होप फॉर लाईफ, मुंबई यांच्या मार्फत मास्क, सॅनिटायझर, हॅन्डग्लोस, बिसकिट्स चे बॉक्स उपलब्ध करून या कार्यालयाचे कर्मचाऱ्यांस वाटप केले व विनामुल्य रुग्णवाहिका सदर कालावधीत उपलब्ध करून दिली.

वरील किट व रुग्णवाहिका विनामुल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे खूप धन्यवाद.

आपला

(प्रसाद कालेकर)
नायब तहसीलदार.
185,मलबार हिल मतदार संघ.

आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई

दिनांक:–०७/०९/२०२०

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येथे की, श्री. शंकर मधुकर मुगलखोड, **Grace Foundation**, मुंबई सेंट्रल मुंबई–०८ ही संस्था त्यांचे सुसज्ज रूग्णवाहिकेद्वारे आग्रीपाडा पोलीस ठाणे हद्दीतील बेवारस इसम, बेवारस मयत इसम तसेच इतर औ  ाध,उपचार आवश्यक असलेल्या रूग्णांना त्यांच्या संस्थेच्या रूग्णवाहिकेद्वारे विनामुल्य व तत्परतेने सेवा पुरवितात.

**Grace Foundation** ,संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबद्दल आभारी असून पुढेही असेच सहकार्याची अपेक्षा बाळगुन सदरचे प्रमाणपत्र श्री.शंकर मधुकर मुगलखोड यांना अदा करण्यात येत आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आग्रीपाडा पोलीस ठाणे ★ मुंबई ★

7/9/2020

(सावळाराम आगवणे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
आग्रीपाडा पोलीस ठाणे,मुंबई

# प्रमाणपत्र

दि. १५/०१/२०२०

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री. शंकर मधुकर मुगलखोड, Grace Foundation मुंबई सेंट्रल, मुंबई ४००००८ हि संस्था त्यांचे सुसज्ज रूग्ण वाहिकेव्दारे डोंगरी पोलीस ठाणे हद्दीतील आजारी बेवारस इसम व बेवारस मृतदेह तसेच औषधोपचार आवश्यक असलेल्या रूग्णांना त्यांच्या संस्थेच्या रूग्णवाहिकेव्दारे विनामुल्य व तत्परतेने सेवा पुरवितात.

Grace Foundation संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबदद्ल आभारी असुन पुढेही असेच सहकाऱ्याची अपेक्षा बाळगुन सदरचे प्रमाणपत्र अदा करण्यात येत आहे.

INSPECTOR OF POLICE DONGRI POLICE STATION सत्यमेव जयते MUMBAI

(संदिप भागडीकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई.

*शासकीय महिला भिक्षेकरी गृह,चेंबुर,मुंबई यांचे कार्यालय.*
*जै मंदिरा समोर,आर.सी.मार्ग,चेंबूर,मुंबई-७१*
E-mail : femalebeggershome@gmail.com
दुरध्वाी क्रमांक ०२२- २५२७०९०७

---

दि. 1/06/2020

प्रति,
ग्रेस फाऊंडेशन
होप फॉर लाईफ
मुंबई.

आपल्याकडुन खालील साहित्य Lockdown कालावधीत महिला भिक्षेकरी गृह चेंबूर व पुरुष भिक्षेकरी गृह चेंबूर या दोन्ही संस्थाना मदत म्हणुन दान स्वरुपात देण्यात आले. अशीच पुढेही मदत मिळावी अशी अपेक्षा आहे.

कांदे
टोमॅटो
बटाटे

वरील साहित्य मिळाल्याबद्दल धन्यवाद

1/06/2020
परिवीक्षा अधिकारी
महिला भिक्षेकरी गृह
चेंबूर, मुंबई-७१

महाराष्ट्र शासन
GRANT GOVT. MEDICAL COLLEGE &SIR J.J.GROUP OF HOSPITALS,MUMBAI
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई
Tel.No.373 55 55, 373 1144 ; Fax No.373 55 99; e-mail – deangmcjjh@gmail.com www.gmcjjh.org

Date: 09/09/2020

# 'APPRECIATION LETTER'

As we know during this unprecedented times, We are all fighting the battle against Covid-19 pandemic that has destroyed multiple lives and livelihoods.

We would like to take this opportunity to thank,
**Grace Foundation** for helping 3 patients of Sir JJ Hospital reach their respective homes during this unprecedented crisis, where it is extremely difficult to travel due to restrictions and lack of the capability of the patient to afford the travel.

Hope you keep supporting us this way during these testing times & in near future as well.

Thanking You.

With Kind Regards,

R. M. O.
Superintendent Office
Sir J. J. Group of Hospitals
Mumbai 400 008

MEDICAL SUPERINTENDENT ★ SIR J.J. GROUP OF HOSPITAL, MUMBAI-400 008 ★

# प्रमाणपत्र

दिनांक-१५/०१/२०२०

असे प्रमाणित करण्यात येते की, नागपाडा पोलीस ठाणे हद्दीतील शंकर मधुकर मुगलखोड, Grace foundation मुंबई  सेंट्ल, मुंबई ०८ ही संस्था त्यांचे सुसज्ज रूग्ण वाहिकेद्वारे सर जे जे मार्ग पोलीस ठाणे हद्दीतील बेवारस इसम, बेवारस मयत इसम तसेच इतर औषध उपचार आवश्यक असलेल्या रूग्णांना त्यांच्या संस्थेच्या रूग्णवाहिकेद्वारे विनामुल्य व तत्परतेने सेवा पुरवितात.

सर जे जे मार्ग पोलास ठाणे हे सदरील संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबद्दल आभारी असुन पुढेही असेच सहकार्याची अपेक्षा बाळगुन त्यांना प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

15/1/20

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
सर जे जे मार्ग पोलीस ठाणे,मुंबई

# प्रमाणपत्र

दिनांक-१५/०१/२०२०

असे प्रमाणित करण्यात येते की, नागपाडा पोलीस ठाणे हद्दीतील शंकर मधुकर मुगलखोड, Grace foundation मुंबई सेंट्ल, मुंबई ०८ ही संस्था त्यांचे सुसज्ज रूग्ण वाहिकेद्वारे सर जे जे मार्ग पोलीस ठाणे हद्दीतील बेवारस इसम, बेवारस मयत इसम तसेच इतर औषध उपचार आवश्यक असलेल्या रूग्णांना त्यांच्या संस्थेच्या रूग्णवाहिकेद्वारे विनामुल्य व तत्परतेने सेवा पुरवितात.

सर जे जे मार्ग पोलास ठाणे हे सदरील संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबद्दल आभारी असुन पुढेही असेच सहकार्याची अपेक्षा बाळगुन त्यांना प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
सर जे जे मार्ग पोलीस ठाणे, मुंबई

# "प्रमाणपत्र"

दि.१५/०१/२०२०

असे प्रमाणित करण्यात येते की, मा.र.आं.मार्ग पोलीस ठाणें हद्दीत शंकर मधुकर मुगलखोड, Grace Foundation मुंबई सेंटर, मुंबई ०८ ही संस्था त्यांचे सुसज्ज रूग्ण वाहिकेव्दारे मा.र.आं.मार्ग पोलीस ठाणे हद्दीतील बेवारस इसम, बेवारस आजारी इसम तसेच इतर औषधउपचार आवश्यक असलेल्या रूग्णांना त्यांच्या संस्थेच्या रूग्णवाहिकेव्दारे विनामुल्य व तत्परतेने सेवा पुरवितात.

मा.र.आं.मार्ग पोलीस ठाणे हद्दीतील सदरील संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबदल आभारी असून पुढेही असेच सहकार्याची अपेक्षा बाळगुन त्यांना प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक

मा.र.आं.मार्ग पोलीस ठाणे,

मुंबई

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई

# "प्रमाणपत्र"

दि.०६/१०/२०१९

असे प्रमाणित करण्यात येते की, नागपाडा पोलीस ठाणे हददीतील शंकर मधुकर मुगलखोड, **Grace foundation** मुंबई सेंटर,मुंबई ०८ ही संस्था त्यांचे सुसज्ज रूग्ण वाहिकेव्दारे नागपाडा पोलीस ठाणे हददीतील बेवारस इसम, बेवारस मयत इसम तसेच इतर औषध उपचार आवश्यक असलेल्या रूग्णांना त्यांच्या संस्थेच्या रूग्णवाहिकेव्दारे विनामुल्य व तत्परतेने सेवा पुरवितात.

नागपाडा पोलीस ठाणे हे सदरील संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबदल आभारी असुन पुढेही असेच सहकार्याची अपेक्षा बाळगुन त्यांना प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
नागपाडा पोलीस ठाणे,मुंबई

पायधूनी पोलीस ठाणे, मुंबई.
दि. १५/०१/२०२०.

# प्र मा ण प त्र

असे प्रमाणित करण्यात येते की, **श्री. शंकर मधुकर मुगलखोड, Grace Foundation**, मुंबई सेंटर, मुंबई–०८ ही संस्था त्यांचे सुसज्ज रूग्णवाहिकेव्दारे पायधुनी पोलीस ठाणे हद्दीतील बेवारस इसम, बेवारस मयत इसम तसेच इतर औषध उपचार आवश्यक असलेल्या रूग्णांना त्यांच्या संस्थेच्या रूग्णवाहिकेव्दारे विनामुल्य व तत्परतेने सेवा पुरवितात.

**Grace Foundation**, संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबद्दल आभारी असून पुढेही असेच सहकार्याची अपेक्षा बाळगुन सदरचे प्रमाणपत्र **श्री. शंकर मधुकर मुगलखोड** यांना अदा करण्यात येत आहे.

(सुभाष दुधगांवकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई

# शासकीय महिला भिक्षेकरी गृह, चेंबूर,मुंबई यांचे कार्यालय.

जैन मंदिर समोर,आर.सी.मार्ग, चेंबूर मुंबई ७१

फोा ंबर :- ०२२- २५२७०९०७ Email ID:-femalebeggershome@gmail.com


---

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, अधिक्षक शासकीय महिला भिक्षेकरी गृह चेंबूर या संस्थेत भिक्षा प्रतिबंधक अधिनियम १९५९ अन्वये मा. महानगर दंडाधिकारी ४५ वे न्यायालय कुर्ला यांचे आदेशान्वये महिला प्रवेशित दाखल होतात. दाखल होणारे महिला भिक्षेकरी हया वयोवृध्द ,अनाथ,निराधार,निराश्रीत ,मनोरुग्ण व असाध्य रोगाने ग्रस्त असलेले दाखल होतात. अशा प्रवेशितांपैकी संस्थेत अतिआजारी प्रवेशितांस तातडीने बाहेरील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करणे अत्यंत गरजेचे असते .अशावेळी तसेच एखादे प्रवेशितास इतर योग्य त्या संस्थेत स्थानांतरीत करणे आवश्यक असते अशावेळी **शंकर मधुकर मुगलखोड grace foundation मुंबई सेंटर मुंबई** -८ हि संस्था त्यांचे सुसज्ज रग्ण वाहीकेव्दारे या संस्थेस विनामुल्य व तत्परतेने सेवा पूरवितात.

अधिक्षक शासकीय महिला भिक्षेकरी गृह चेंबूर हि संस्था सदरील संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबद्दल आभारी असुन पुढेही असेच सहकार्याची अपेक्षा आहे.

दिनांक:- २५/०९/२०१९

स्थळ:- चेंबूर,मुंबई

धन्यवाद

अधिक्षक

शासकिय महिला भिक्षेकरी गह,

चेंबूर मु.७१

महाराष्ट्र शासन
अधिक्षक, शासकीय पुरुष भिक्षेकरी स्विकार केंद्र, चेंबूर, मुंबई यांचे कार्यालय
आर.सी.मार्ग, जैनमंदिरासमोर, चेंबूर, मुंबई-७१
दुरध्वनी क्र.०२२-२५२२१२५५ Email-rcbmchembur@gmail.com

# प्र मा ण प त्र

प्रमाणित करण्यात येते की , शासकीय पुरुष भिक्षेकरी स्विकार केंद्र , चेंबुर , मुंबई -७१ या संस्थेत भिक्षा प्रतिबंधक अधिनियम १९५९ अन्वये मा.महानगर दंडाधिकारी , ४५ वे न्यायालय , कुर्ला यांचे आदेशान्वये पुरुष भिक्षेकरी प्रवेशित दाखल होतात. पुरुष भिक्षेकरी हे वयोवृध्द , अनाथ, अपंग , बेघर , मानसिक रोगी , व्यसनाधिन , गंभीर आजारी , जर्जर ,अपंग , असाध्य रोगाने ग्रस्त असलेले दाखल होतात. अशा प्रवेशितांपैकी संस्थेत अति आजारी प्रवेशितास तातडीने बाहेरील शासकीय रुग्णालयात उपराचासाठी दाखल करणे अत्यंत गरजेचे असते .

अशावेळी शंकर मधुकर मुगलखोड , ग्रेस फाऊंडेशन , मुंबई ही संस्था त्यांचे सुसज्ज रुग्णवाहीकेव्दारे या संस्थेस विनामुल्य व तत्परतेने सेवा पुरवितात.

शंकर मधुकर मुगलखोड , ग्रेस फाऊंडेशन , मुंबई या संस्थेचे कार्य अत्यंत मानवी कल्याणाचे व औदार्याचे आहे. त्यांचे या कार्याबद्दल तसेच संस्थेला सहकार्य केल्या बददल संस्था आपली खुप खुप आभारी असुन पुढेही असेच सहकार्याची अपेक्षा आहे.

धन्यवाद !

OFFICE OF THE SUPERINTENDENT R.C., CHEMBUR, MUMBAI-71 सत्यमेव जयते

11/11/2019

( शरद तु कुऱ्हाडे )
अधिक्षक
शासकिय भिक्षेकरी स्विकार केंद्र(पू)
चेंबुर मुंबई-७१

अमेय अरुण घोले
अध्यक्ष,
सार्वजनिक आरोग्य समिति

बृहन्मुंबई महानगरपालिका

महानगरपालिका मुख्य कार्यालय,
मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. : २२६७ ५८५१ (वै.)
कार्यालय : २२६२ ०२५१
विस्तारित क्र. : ४०४६/४०४७
भ्रमणध्वनी क्र. : ९८२०८९३७९२

पत्र क्र. मचि. / / सा.आ.स.
दिनांक : १४/४/२०२०

प्रति,
**मा. श्री. शंकर मुगलखोड**
ग्रेस फाउंडेशन , मुंबई

महोदय,

मी प्रतिनिधित्व करीत असलेल्या प्रभाग क्रमांक १७८ मधील काही गरजू नागरिकांना या कोरोना नावाच्या संकट समयी मदत करण्यासाठी आपण जे आम्हाला सहकार्य दिलात त्याबद्दल आपले मनःपुर्वक आभार..
धन्यवाद

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

**आपला नम्र**

अमेय अरुण घोले
**नगरसेवक**

BRIHANMUMBAI MAHANAGARPALIKA
PUBLIC HEALTH DEPARTMENT
MUNICIPAL EYE HOSPITAL

MUNICIPAL EYE HOSPITAL MUMBAI 400 008 KAMATHIPURA

Maulana Shaukat Ali Road, Opp. Durgadevi Udyan, Mumbai – 400008

---

No.HO/ 935 /MEH dt.11.09.2020

TO,
DIRECTOR
GRACE FOUNDATION,
MUMBAI CENTRAL,
MUMBAI – 400008

We thank you for providing free abulance services to COVID- 19 patients of Municipal Eye Hospital.

V.V. Sant

Administrative Officer,
Municipal Eye Hospital
11-9-2020

MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI

TOPIWALA NATIONAL MEDICAL COLLEGE
B.Y.L. NAIR CHARITABLE HOSPITAL
DR. A.L. NAIR ROAD, MUMBAI-400008
Tel. No. 23027000

Ref:

Date: 10.09.2020

**To,**
**Mr. Shankar M. Mugalkhod,**
**Grace Foundation**

Dear Sir,

We are thankful to **Mr. Shankar M. Mugalkhod, Grace Foundation** for **providing an ambulance** to BYL Nair Ch. Hospital and TNMC, which was useful for transporting 19 patients after discharge to their homes.

At a time when resources are yet so scarce, and these patients have very little services available to them to find their way home post discharge from the COVID wards, this ambulance was truly helpful in helping these patients.

We are very grateful for your thoughtful gesture and timely help.

We have no words to express our gratitude.

Regards,

**Dean,**
TNMC & BYL Nair Charitable Hospital
Mumbai

DEAN
B.Y.L. Nair Ch. Hospital
T. N. Med. College

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# कामा व आल्ब्लेस रुग्णालय, मुंबई

महापालीका मार्ग, मुंबई ४००००१

# CAMA & ALBLESS HOSPITALS, MUMBAI

Mahapalika Marg Mumbai –400001.

**Email: - suptd.camahospital@gmail.com** ph no:-022-22620390/2761181 /22611667/22611654

**Fax no:-2621197**

Date-09/09/2020

To,
Grace Foundation
Mumbai Central,
Mumbai-400008

Sub: A token of gratitude from Cama & Albless hospital for your kind Gesture.

Cama & Albless Hospital, Mahapalika Marg , Mumbai acknowledges you for transporting 8 patients from our hospital to their respective house. With the help of your free ambulance service.

We are very thankful for your generous gesture. And we ackownledge your much needed support in this pandemic. For this we shall remain thankful to you.

This contribution of yours will be of great help for us in fighting the **Covid19 pandemic.**

We sincerely thank you for your invaluable donation.

Superintendent,
Cama and Albless hospital, Mumbai

Superintendent
Cama & Albless Hospital
Mumbai

# #WorldTBDay-एचआयव्हीबाधित टीबी रुग्णांचा 'तो' बनतोय आधार



एचआयव्हीबाधित असलेल्या टीबी रुग्णांवर योग्य ते उपचार देऊन त्यांना बरं करून सुखरूपपणे घरी सोडण्याचं काम गेल्या कित्येक वर्षांपासून मुंबईतील एक तरुण करतोय. आतापर्यंत या तरुणाने दोन-तीन हजार एचआयव्ही रुग्णांना क्षयमुक्त करून त्यांना नव्यानं आयुष्य जगण्याची संधी दिलीयं

टीबी रूग्ण म्हटलं की त्याच्या मदतीसाठी कोणीही पुढाकार घेत नाही.मात्र अशा रूग्णांना रूग्णालयात दाखल करून त्यांना उपचारांनंतर त्यांच्या घरी सुखरूप सोडण्याचा वसा मुंबईत राहणाऱ्या शंकर मुगलखोड यांनी घेतलाय. रूग्णांची मदत करण्याचा हा वसा शंकर यांना त्यांच्या आईकडून मिळालाय. त्यानुसार आत्तापर्यंत जवळपास तीन हजार एचआव्हीबाधित टीबी रूग्णांना उपचार देऊन घरी सोडलंय.

नये म्हणून या रुग्णांसाठी काम करायचं ठरवलं. आधी एचआयव्हीग्रस्त रुग्णांसाठी काम करत होतो. पण त्यानंतर या रुग्णांमध्ये टीबीचं प्रमाण वाढत असल्याचं समजलं आणि तेव्हापासून या कामात स्वतःला वाहून घेतलं"



टीबीच्या रूग्णांजवळ जायला कोणी बघत नाहीत. त्यातच एचआयव्ही रुग्णाला टीबी असल्याचं कळल्यानंतर डॉक्टरही उपचार द्यायला धास्तावतात. यासंदर्भात शंकर म्हणतात, "टीबी हा संसर्गजन्य आजार असल्यानं लोकांमध्ये भीती असते. हा आजार झाल्याने कुटुंबीय रुग्णांना वाऱ्यावर सोडतात. अशावेळी उपचार न मिळाल्याने हे रुग्ण रस्त्याच्या कडेला पडलेले असतात. या रुग्णांना उचलून त्यांना रुग्णालयात दाखल करून उपचार देण्याचं काम मी करतोय. याशिवाय हे रुग्ण बरे झाल्यानंतर त्यांना घरीही सोडतोय. आतापर्यंत दोन ते तीन हजार रुग्णांना बरं करून त्यांना सुखरूप घरी पोहोचवलंय."



शंकर पुढे म्हणाले की, "या कामाला सुरूवात केली तेव्हा माझ्यासोबत कोणी नव्हतं. पण आता पत्नी आणि मुलं साथ देतायत. याशिवाय मित्रांकडूनही पाठिंबा मिळतोय. सध्या माझ्याकडे एक मोबाईल व्हॅन आहे. ही व्हॅन घेऊन मी मुंबईत फिरत असतो. ज्याठिकाणी रस्त्यावरच्या कडेला कोणी टीबी रुग्ण दिसल्यास त्याला घेऊन थेट रुग्णालय गाठतो. या रुग्णाच्या उपचारांचा सर्व खर्च कधी स्वतःच्या खिशातून तर काही स्वयंसेवी संस्थेद्वारे करतोय."



"एचआयव्हीचं प्रमाण शून्यावर आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार प्रयत्न करतंय. पण ज्या एचआयव्ही रुग्णांना घरातून बाहेर काढलं अशांना मुंबईत राहण्यासाठी फक्त दोनच संस्था आहेत. या तुलनेत रुग्णांची संख्या अधिक आहे. यासाठी सरकारने या रुग्णांना राहण्याची व्यवस्था करणं गरजेचं आहे. याशिवाय रात्रीच्या वेळी एखादा रुग्ण आढळून आल्यास त्याला ठेवण्यासाठी कोणीही सोय नाही. यासाठी पालिकेनं एक शेड उभारण्यासाठी जागा द्यावी, अशी विनंती करण्यासाठी महापौरांना पत्र पाठवलंय" असंही शंकर यांनी सांगितलं.